


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 44 | स्त्री भ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या<br>**संगीता गोविंदराव घार** | 95 |
| 45 | लैंगिक असमानता भारताच्या मानव विकासापुढील गंभीर समस्या<br>**डॉ.अशोक टिपरसे** | 97 |
| 46 | महिला आरक्षण व प्रतिनिधित्व : एक अभ्यास<br>**डॉ. एस.यु. ढाले** | 99 |
| 47 | भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल<br>**डॉ. राजश्री अप्पाराव जाधव** | 101 |
| 48 | स्त्री- पुरुष असंतुलन एक समस्या<br>**प्रा. डॉ. बी. के. शिंदे** | 103 |
| 49 | प्रसारमाध्यमांतील स्त्रीचे रेखाटन:- वास्तव आणि प्रमाण<br>**सुवर्णा उमाकांत टेंकाळे** | 106 |
| 50 | भारतीय स्त्री-पुरूष गुणोत्तरातील समस्येचे स्वरूप<br>**सौ. रिता कदम (खोसे)** | 108 |
| 51 | मध्ययुगीन भारतातील एकमेव महिला राज्यकर्ती रजिया सुलताना (१२३६-१२४०)<br>**प्रविण लक्ष्मणराव कदम** | 110 |
| 52 | भारतीय उद्योग क्षेत्रातील महिला उद्योजक<br>**डॉ. ए.पी. कुंटे** | 112 |
| 53 | महिलांचा राजकारणातील सहभाग - एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**आशा अर्जुनराव मडके** | 114 |
| 54 | स्थानिक स्वशासनातील महिलांचा सहभाग<br>**डॉ. डी.एम. कदम** | 116 |
| 55 | महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा<br>**डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे)** | 118 |
| 56 | महिलांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती<br>**भिमराव पां. उगले, डॉ. सुरेश ढाके** | 120 |
| 57 | भारतीय स्त्री - पुरुष गुणोत्तरातील असमतोल<br>**मोहन व्यंकटराव बंडे** | 122 |
| 58 | स्त्री मुक्तीमध्ये शिक्षणाची भूमिका<br>**डॉ. रामदास डी. मुक्टे** | 124 |


345

# लैंगिक असमानता भारताच्या मानव विकासापुढील गंभीर समस्या

डॉ.अशोक टिपरसे
अर्थशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर,
नांदेड, जि.नांदेड

45

**गोषवारा**

*मानव विकासाची अमर्त्य सेन यांच्या क्षमतेच्या (Capability) संकल्पनेवर आधारलेली आहे. केवळ उत्पन्न वाढ म्हणजे विकास नव्हे, तर प्रत्येक राष्ट्रातील विकासामुळे त्या राष्ट्राच्या नागरिक स्त्री-पुरुषांना क्षमतेच्या वरच्या पातळीवर नेले पाहिजे. माणसांची क्षमता वाढविणारा विकास याला मानव विकास असे नांव देवून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) हा विकास मोजण्याचा निर्देशांक तयार केला, ज्या निर्देशांकात उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य यांचा समावेश केला जातो. मानव विकास निर्देशांक हा देशाचा सामाजिक व आर्थिक विकासाचा निकष मानला जातो. जागतिक मानव विकास निर्देशांक २०१५ नुसार १८८ देशात भारताचा १३० वा क्रमांक लागतो. ही बाब भारताला भूषणावह नाही, तसेच लिंगाधारित असमानता निर्देशांक २०१५ नुसार १८८ देशांत भारताचा १३० वा क्रमांक लागतो. यावरुन भारतात असणारी स्त्री-पुरुष असमानताच स्पष्ट होते.*

**प्रस्तावना :-**

सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे (UNDP) पहिला मानव विकास अहवाल प्रसिध्द करण्यात आला. मेहबुब-उल-हक आणि अमर्त्य सेन त्यांचे प्रणेते होते. या अहवालात बाल कल्याण, महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, उत्पन्न, आहार व पोषण, दारिद्र्य निर्मूलन तसेच रोजगाराच्या संधी वगैरे निर्देशकांच्या आधारावर मानवी विकासाचे मोजमाप केले आहे. त्या निर्देशांकाच्या आधारावर जागतिक पातळीवर प्रत्येक देशाला विशिष्ट क्रमांक दिला गेला व त्या क्रमांकावरुन संबंधीत देशाची मानवी विकासाची पातळी निश्चित करण्यात आली. प्रत्येक अहवालाचा एक विशिष्ट विषय असतो - उदा.दारिद्र्य, लिंगभाव, राजकीय हक्क इत्यादी.

संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या वर्ष २०१५ मधील अहवालानुसार, मानवी विकास निर्देशांकाबाबत २०१५ मध्ये एकुण १८८ देशांच्या यादीत भारत १३० व्या क्रमांकावर होता. त्यापुर्वीच्या वर्षात (२०१५) भारत १३५ व्या क्रमांकावर होता. भारताचे एचडीआय मूल्य २०१५ मध्ये ०.६०९ झाले आहे. तसेच मानव विकासाच्या बाबतीत देश मध्यम श्रेणीत आला आहे. यानुसार, १९८० ते २०१५ दरम्यान भारताचे एचडीआय मुल्य ०.३६२ वरुन ०.६०९ वर पोचले आहे. म्हणजेच यात ६८.१ टक्के वाढ झाली आहे.

मानवी विकास निर्देशांक नॉर्वे आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड अनुक्रमे दुसऱ्या



345

व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बांगलादेश व पाकिस्तान या यादीत १४२ व १४७ व्या क्रमांकावर आहेत. ब्रिक्स देशांमध्ये भारताचे स्थान सर्वात खालचे आहे.

**जागतिक स्तरावरील विकासाचे निर्देशांक :-**

जागतिक पातळीवर स्त्रीचा दर्जा अनेक वर्षापासून एक वादग्रस्त मुद्दा होता. स्त्रियांना कोणत्याच क्षेत्रात पुरुषांच्या वरोबरीने सहभाग मिळत नाही हा एक बहुतेक देशात वादळी चर्चेला विषय होता. यु.एन.डी.पी.मार्फत दरवर्षी मानव विकास अहवाल (Human Development Report) जाहिर केला जातो. या अहवालात विविध देशांसाठी पुढील ५ प्रमुख निर्देशांकाची गणना केली जाते.

१) मानव विकास निर्देशांक

२) लिंग भावात्मक विकास निर्देशांक

३) असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक

**लैंगिक असमानता निर्देशांक :-**

महिलाच्या विकासाचा स्तर परिगणित करण्यासाठी लिंगविषयक विकास सूचक वापरले जातात उदा. लैगिक जेंडर (Gender Ineaulity Index GII) असमानता निर्देशांक हा निर्देशांक २०१० च्या अहवालात लागू करण्यात आला त्याने १९९५ पासून लागू करण्यात आलेल्या लिंग आधारित विकास निर्देशांक (GDI) व लिंग सबलीकरण परिणाम (GEM) याची जागा घेतली आहे. त्याची गणना पुढील प्रमाणे करण्यात येते.

**जनन आरोग्य (Reproductive Helth):-**

ते मोजण्यासाठी पुढील निर्देशांक वारले जातात.

१) माता मर्त्यता (Maternal Mortality)

२) किशोरवयीन जन्यता (Adolescent Fertility)

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधन लेखावरुन पुढील प्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

१. भारतामध्ये स्त्री-पुरुष असमानता निर्माण झाल्यामुळे त्याचे सामाजिक, आर्थिक, मानवी व सांस्कृतिक विकासावर दुष्परिणाम होत आहे.

२. लिंग विषमता या आघाड्यावर भारत शेजारी राष्ट्राच्या तुलनेत देखील पिछाडीवर आहे.

## संदर्भ सुची :-


1. Boserup, Esther (1970) Womens Role in Economic Development New York: St.Martins Press.
2. National Human Development Report 2011 / Planning Commission, Government of India New Delhi.
3. UNDP (United Nations Development Programme) Human Development Report 2015 New York and Oxford University Press.
4. Maharashtra Human Development Report 2012 Towards Inclusive Human Devlopment Yashwantrao Chavan Academy of Development Administration Pune.
5. Govememnt of Maharashtra (2015-16) Economic Survey of Mahrashtra Deirectorate of Statisticsand Ecomonics




346